Circular Marathi

# मुंबई विद्यापीठ

क्र.मा.सं.वि.क/आयसीसी/२०२३-२४/१२

संदर्भ- १. शासन परिपत्रक क्रमांक : GAD-३२०३६/१२/२०२३- GAD(DESK-१८)
दिनांक २९ डिसेंबर, २०२३
२. शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१५/प्र.क्र. १२९/१८ (र.व.का.),
दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/ विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, प्रभारी संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी, समन्वयक, रत्नागिरी उपपरिसर, समन्वयक, ठाणे उपपरिसर, समन्वयक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड अप्लाईड सायन्सेस, कल्याण उपकेंद्र, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, प्रभारी विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना उपरोक्त संदर्भिय १. व २. च्या शासन निर्णयाव्दारे पत्रलेखनाबाबत व टिप्पणी लेखन केल्यानंतर त्याखाली स्वाक्षरी करण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्याने स्वत:चे नाव, पदनाम व दिनांक नमूद करण्याची पध्दत अवलंबण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.

तरी या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, **कार्यालयातून निर्गमित होणाऱ्या प्रत्यंक पत्रावर स्वाक्षरीखाली कंसामध्ये स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व त्याखाली त्याचे पदनाम लिहीण्यात यावे. केंद्र शासनाच्या कार्यालीयन कार्यपध्दती नियमपुस्तिका ३२ (१०) अनुसार टिप्पणी सादर करताना अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व दिनांक नमूद करणे आवश्यक आहे. तसेच कोणत्याही प्रकरणी कार्यालयीन टिप्पणी वरिष्ठांना मान्यतेस्तव/आदेशार्थ सादर करताना अधिकाऱ्यांच्या स्तरानुसार क्रमाने चिन्हांकित करण्यात यावी. असे चिन्हांकन करताना ज्यांना टिप्पणी सादर करण्यात येत आहे, त्या संबंधित अधिकाऱ्यांनी टिप्पणी खाली स्वाक्षरी करताना दिनांक नमूद करावा. चिन्हांकन करताना संबंधित अधिकाऱ्याचे आडनाव (एकच आडनाव असलेले एकापेक्षा जास्त अधिकारी असल्यास आडनावापूर्वी त्यांची आद्याक्षरे सुध्दा) नमूद करावे.**

सदर बाब सर्व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी /कर्मचाऱ्यांना निदर्शनास आणून द्यावी तसेच सदर कार्यपध्दतीचे काटेकारेपणे पालन करावे.

(प्रा.सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

२, जानेवारी, २०२४
मुंबई - ४०००३२

प्रति,
विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल,
प्रभारी संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी,
संचालक, रत्नागिरी उपपरिसर,
संचालक, ठाणे उपपरिसर,
संचालक, सिंधुदुर्ग उपपरिसर,
सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे कक्षांचे प्रमुख

(ऐ) प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित -

१. विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य.
२. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
३. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
४. स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय.
५. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर , विद्यानगरी परिसर, रत्नागिरी, ठाणे व सिंधुदुर्ग उपपरिसर)
६. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
७. सुरक्षा अधिकारी, तसेच सर्व सहायक सुरक्षा अधिकारी.
८. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.
९. उद्यान अधिक्षक/अधिक्षक (तांत्रिक) , विधी विभाग
१०. स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) प्र-कुलगुरु(३) प्रभारी कुलसचिव (४) प्रभारी वित्त व लेखा अधिकारी (५) प्रभारी संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित -

१. सचिव, उ.मा.सा.
२. सचिव, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स व वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)
३. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ.
४. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना.
५. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना.
६. सचिव, ऑल इंडिया आदिवासी एम्पलॉइज फेडरेशन शाखा मुंबई विद्यापीठ.
७. सचिव, मुंबई विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या.

(प्रा.सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : GAD-३२०३६/१२/२०२३-GAD(DESK-१८)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ डिसेंबर, २०२३

**संदर्भ :** १) शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-१००५/५६६/प्र.क्र.३०/२००५ १८(र.व का.), दि.१६ जून, २००५
२) शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२९/१८(र.व का.), दि.१० फेब्रुवारी, २०१६
३) शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.८१/२००५ १८(र.व का.), दि.३० मे, २०१८
४) शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१२९/१८(र.व का.), दि.१७ ऑक्टोबर, २०१५

**शासन परिपत्रक**

मंत्रालयीन विभागातून निर्गमित होणाऱ्या प्रत्येक पत्रावर स्वाक्षरीखाली कंसामध्ये अधिकाऱ्याचे नाव व त्याखाली त्याचे पदनाम लिहिण्याची जी पद्धत आहे, त्याप्रमाणे राज्यातील सर्व शासकीय कार्यालयामधून पत्र निर्गमित करतेवेळी प्रत्येक पत्रावर स्वाक्षरीखाली कंसामध्ये स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व त्याखाली त्याचे पदनाम लिहिण्याच्या सूचना संदर्भाधीन क्र.१ ते ३ येथील परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तथापि, काही अधिकारी त्यांच्या स्वाक्षरीखाली त्यांचे नाव व पदनाम लिहित नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.

२. तसेच, संदर्भाधीन क्र.४ येथील परिपत्रकान्वये टिप्पणीवरील चिन्हांकने कशाप्रकारे करावीत याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचना देऊनही अद्यापही काही अधिकारी/कर्मचारी टिप्पणीलेखन करताना योग्यप्रकारे चिन्हांकन करत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

३. सबब सर्व मंत्रालयीन विभागांना पुन्हा सूचित करण्यात येते की, कार्यालयामधून निर्गमित होणाऱ्या प्रत्येक पत्रावर स्वाक्षरीखाली कंसामध्ये स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व त्याखाली त्याचे पदनाम लिहिण्याच्या सूचनेचे तंतोतंत पालन करावे, तसेच आपल्या अधिनस्त कार्यालयांनाही तसे सूचित करावे आणि टिप्पणीलेखन करताना संदर्भांकित क्र.४ येथील परिपत्रकामध्ये स्पष्ट केल्यानुसार चिन्हांकन करण्याची दक्षता घ्यावी. जेणेकरून भविष्यात अशा पत्रांबाबत किंवा टिप्पणी लेखनाबाबत काही समस्या उद्भवल्यास पत्रावर स्वाक्षरी करणाऱ्या/टिप्पणी मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याचा शोध घेणे अधिक सोपे होईल.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२३१२२९१२१७२२४४०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

ROSHANI DINESH KADAM PATIL

Digitally signed by ROSHANI DINESH KADAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=685cbbb5899027ea29d44ae02d12f2c1313143ad8376755d0e815a1eb20fd0ce, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=16D26A3CE7C86CC341C246E6B8468A80B20659CCB13144AF609F03226E908A0C, cn=ROSHANI DINESH KADAM PATIL
Date: 2023.12.29 12:16:25 +05'30'

**(रो.दि.कदम-पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
३. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
४. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ३२.
७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ३२.
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
९. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.
१०. निवडनस्ती.

**टिप्पणी लेखन केल्यानंतर त्याखाली स्वाक्षरी करण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्याने स्वतःचे नाव, पदनाम व दिनांक नमूद करण्याची पद्धत अवलंबण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण- २०१५ / प्र. क्र. १२९ / १८ ( र. व का.)**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ ऑक्टोबर, २०१५

**परिपत्रक :**

कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिकेनुसार कोणताही संदर्भ निकाली काढण्यासाठी टिप्पणी लेखन करण्यात येते. टिप्पणीस मान्यता मिळण्यासाठी चढत्या क्रमानुसार सर्व संबंधित अधिकाऱ्यांकडे टिप्पणी सादर करण्यात येत असते. टिप्पणी ज्या अधिकाऱ्यांना चिन्हांकित करण्यात येते, त्या अधिकाऱ्यांचे पदनाम टिप्पणीवर दर्शविण्यात येते. तथापि त्यामध्ये संबंधित अधिकाऱ्याचे नाव नमूद करण्यात येत नसल्याने भविष्यात टिप्पणी लेखनाबाबत काही समस्या उद्भवल्यास टिप्पणी मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याचा शोध घेणे कठीण होते.

२. केंद्र शासनाच्या कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिका नियम ३२ (१०) अनुसार टिप्पणी सादर करताना अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.

३. वरीलप्रमाणे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना सूचित करण्यात येते की, केंद्र शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

४. कोणत्याही प्रकरणी कार्यालयीन टिप्पणी वरिष्ठांना मान्यतेस्तव / आदेशार्थ सादर करताना अधिकाऱ्यांच्या स्तरानुसार क्रमाने चिन्हांकित करावी. असे चिन्हांकन करताना ज्यांना टिप्पणी सादर करण्यात येत आहे, त्या संबंधित अधिकाऱ्यांनी टिप्पणीखाली स्वाक्षरी करताना दिनांक नमूद करावा. चिन्हांकन करताना संबंधित अधिकाऱ्याचे आडनाव (एकच आडनाव असलेले एकापेक्षा जास्त अधिकारी असल्यास आडनावापूर्वी त्यांची आद्याक्षरेसुद्धा) नमूद करावे. ही कार्यपद्धती अवलंबण्याबाबत काटेकोरपणे कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालयीन प्रमुख यांना देण्यात याव्यात.

५. टिप्पणीवर चिन्हांकन कसे असावे, याबाबतचे उदाहरण खालील तक्त्यात दर्शविण्यात आले आहे.

| |
|---|
| कक्ष अधिकारी ( श्री. हे. सु.जोशी) |
| अवर सचिव ( श्रीमती पाटील ) |
| उप सचिव ( श्री. पं. रा. जोशी) |
| सचिव ( श्री. जाधव ) |

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०१५१०१७१२५१०८२९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satyaraj Maruti Sabale

Digitally signed by Satyaraj Maruti Sabale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=66b2493a65a1aa71c5ad81c97529b47e93b142be85445b94a5520753e7beb6c1, cn=Satyaraj Maruti Sabale
Date: 2015.10.17 13:03:55 +05'30'

**( स. मा. साबळे )**
**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
३) मा. राज्यपालांचे सचिव ( ५ प्रती ),
४) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ( ५ प्रती ),
५) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
६) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
७) मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
८) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१०)प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
११)प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१२)सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१३)सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४)प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१५)मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१६)सर्व विभागीय आयुक्त,
१७)सर्व जिल्हाधिकारी,
१८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९)सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
२०)प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२१)महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई ( ५ प्रती ),
२२)सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२३)निवड नस्ती ( कार्यासन १८ ).